| MHPU120002252023 | नियमित दिवाणी दावा क्र.४३/२०२३<br>निशाणी क्रमांक ८४ वरील आदेश<br>(शैलेश गजानन फाटक व इतर वि.सागर दत्तात्रय पवार व इतर) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.४ दिगंबर कृष्णा पवार यांनी दावा मिळकत गट क्र.१९२ मध्ये प्रतिवादी क्र.१३,१४ व १५ यांनी त्रयस्थ पक्षकारांचा हक्क व हितसंबंध निर्माण करु नये अशा तुर्तातुर्त मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादीने प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता मौजे शिवरे, ता. भोर जि.पुणे, येथील गट नंबर १९२ संदर्भात दाखल केलेला आहे. त्यामध्ये न्यायालयाने प्रतिवादींना त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्यास मनाई केलेली आहे. त्यानंतर प्रतिवादी क्र.१३, १४ व १५ यांनी त्यांना पक्षकार करण्यासंदर्भात अर्ज दाखल केला होता. त्याप्रमाणे दि.१०/१०/२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर झालेला आहे. त्याप्रमाणे त्यांना प्रस्तुत दाव्यात पक्षकार करण्यात आलेले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे दि.२४/०६/२०२५ रोजी प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांनी गट क्र. १९२ संदर्भात नोंदणीकृत दस्त हवेली येथे नोंदविलेला आहे. त्याबाबत प्रस्तुत प्रतिवादीना माहिती झाल्यानंतर त्यांनी त्यांची हरकत संबंधित दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदविलेली आहे. त्याप्रमाणे दि.०८/०९/२०२५ रोजीच्या पत्राप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादीस दि.१६/०९/२०२५ रोजी मनाई आदेशासह उपस्थित राहण्याबाबत बजाविण्यात आलेले आहे.

**०३.** प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे दुय्यम निरीक्षक भोर येथे देखील त्यांनी त्यांची हरकत नोंदविलेली आहे. त्याप्रमाणे दि.०९/०९/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित अधिकाऱ्यांनी स्पष्टीकरण व सद्यस्थिती मागितली आहे. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे दाव्यामध्ये मनाई असताना देखील प्रतिवादी क्र. १३ ते १५ त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्याचप्रमाणे पूर्वीच्या मनाई आदेशास प्रतिवादी क्र.१३ ते १५ हे पक्षकार नसल्याचा ते गैरफायदा घेवून दावा मिळकती संदर्भात व्यवहार

करण्याच्या प्रयत्नात आहेत. सबब, त्यांना मनाई हुकुमाद्वारे प्रतिबंधित करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे विरोधात मनाई न दिल्यास प्रस्तुत प्रतिवादीच्या हक्क व हितसंबंधांना बाधा निर्माण होणार आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०४.** प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांनी नि.९४ वर त्यांचे संयुक्त म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. त्यांनी अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारलेला आहे. प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे न्यायालयाने दिलेली मनाई ही गट नंबर ४५ बाबत असून प्रस्तुत प्रतिवादीने दिलेल्या अर्जामधील दावा मिळकतीशी मुळ वादीचा कोणताही संबंध नाही. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे गट क्र.१९२ चा प्रत्यक्षात दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. सबब, प्रतिवादी क्र.४ यांनी मागणी केलेल्या गट क्र.१९२ चा दावा मिळकतीशी काहीही संबंध नसल्यामुळे प्रतिवादी क्र.४ चा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

**०५.** प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे गट क्र.१९२ हा प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांच्या मालकीचा आहे. त्याचप्रमाणे गट क्र.१९२ ही दावा मिळकत नसल्यामुळे त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.४ यास कोणतीही दाद मागता येणार नाही. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र. ३ ते १२ यांचे विरुध्द नियमित दिवाणी दावा क्र.१५७/२०२१ दाखल केलेला होता.परंतु त्यामध्ये प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांची फसवणूक करण्याच्या उद्देशाने त्यांना त्यामध्ये पक्षकार केलेले नाही. त्यानंतर न्यायालयाची फसवणूक करुन हुकुमनामा मिळविला आहे. त्याबाबत प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांना माहिती झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्र अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे गट क्र.१९२ बाबत इतरही न्यायालयात दावा असल्याची माहिती असतानादेखील केवळ प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांचा हिस्सा डावलण्याच्या उद्देशाने नियमित दिवाणी दावा क्र.१५७/२०२१ दाखल केलेला होता. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते १२ यांनीच न्यायालयाची व प्रतिवादी क्र.१३ ते १५

यांची फसवणूक केलेली आहे. सबब, त्यांनी अर्ज खर्चासहित फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

**०६.** अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुच्या विधीज्ञांचा युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझे विचारार्थ उद्भवतात. त्यावर मी कारणांसहित उत्तरे यापुढे नमुद करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.४ हे प्रथमदर्शनी केस त्यांच्या लाभात असल्याचे सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| २. | तुर्तातूर्त मनाई न दिल्यास प्रतिवादी क्र.४ चे अपरिमित नुकसान होणार आहे असे प्रतिवादी सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| ३. | सोयीस्करतेचा तुला प्रतिवादी क्र.४ यांच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात काय ? | **होकारार्थी** |
| ४. | आदेश काय ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

**०७.** प्रतिवादी क्र.४ व प्रतिवादी क्र.१३ ते १५ च्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या कथनाशी सुसंगत असा युक्तीवाद केलेला आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.४ च्या विद्वान विधीज्ञांनी त्यांचा लेखी युक्तीवाद नि.९५ वर दाखल केलेला आहे. सदर युक्तीवादाचा सारांश विचारात घेता गट क्र.१९२ मध्ये प्रतिवादी क्र.४ चे हक्क व हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण केल्यास प्रतिवादी क्र.४ चे कधीही भरुन न येणारे नुकसान होवू शकते असे प्रतिवादीचे एकंदरीत कथन आहे. याउलट प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांच्या विद्वान विधीज्ञांची युक्तिवाद विचारात घेता गट क्र.१९२ ही दावा मिळकत असल्यामुळे त्याबाबत

मनाई अर्ज दाखल करता येवू शकत नाही असा त्यांनी युक्तिवाद केला. तसेच मुळ वादी याचा हक्क व हितसंबंध केवळ गट क्र.४५ मध्ये असल्यामुळे दावा मिळकत ही केवळ गट क्र.४५ इतकीच आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादींमध्ये वाटपाकरीता दावा प्रलंबित आहे. परंतु त्यामध्ये प्रस्तुत प्रतिवादी हे कोणतेही पाऊल उचलत नाहीत. याउलट त्यांच्या म्हणण्याप्रमाणे केवळ प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांना त्रास देण्याकरीता त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

०८. सुरुवातीस हे नमूद करणे आवश्यक आहे की, मुळ वादीने नि.५ वर तुर्तातुर्त मनाईकरीता अर्ज दाखल केला होता. सदर अर्ज हा गुणदोषावर दि.०८/०५/२०२४ रोजी माझ्या विद्वान पूर्वाधिकाऱ्यांनी मंजूर केलेला आहे व त्याप्रमाणे प्रतिवादी त्यांचे नोकर चाकर अथवा त्यांच्या मार्फत हक्क सांगणाऱ्या इतर कोणत्याही पक्षकारांना दावा मिळकतीमध्ये वादीच्या वहिवाटीस हरकत, अडथळा करण्यापासून तसेच दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्यापासून प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे. त्याप्रमाणे नियमित दिवाणी दावा क्र. १५७/२०२१ मध्ये पारित करण्यात आलेल्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीला देखील स्थगिती देण्यात आलेली आहे. सदर आदेशाविरुध्द कोणत्याही पक्षकाराने वरिष्ठ न्यायालयात दाद मागितली नाही. त्यामुळे सदर आदेश देखील कायम राहिलेला आहे व तो उभय पक्षकारांवर बंधनकारक आहे. परंतु सदर अर्ज निर्गमित करत असताना प्रतिवादी क्र.१३ ते १५ हे दाव्यास पक्षकार नव्हते. याउलट दि.१०/१०/२०२४ च्या नि. ७३ वरील आदेशाने प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांना प्रस्तुत दाव्यात समाविष्ट करण्यात आलेले आहे. त्यामुळे स्वाभाविकच दि.०८/०५/२०२४ रोजी पारित करण्यात आलेला आदेश प्रस्तुत प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांच्यावर कायद्याप्रमाणे बंधनकारक नाही.

**०९.** प्रस्तुत दाव्यात मुळ वादीने लोकअदालतीमध्ये तडजोडीने झालेला हुकुमनामा आव्हानित केलेला आहे. सदर तडजोडीस दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २३ नियम ३ अ ची बाधा येत असल्याबाबत सुरुवातीस प्रतिवादी यांनी दिवाणी प्रक्रिया आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केला होता. परंतु तो अर्ज देखील माझ्या विद्वान पूर्वाधिकाऱ्यांनी नामंजूर केलेला आहे.

**१०.** प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल केलेला नाही. प्रतिदाव्याच्या अनुपस्थितीत प्रतिवादीस मनाई मागण्याचा हक्क आहे किंवा कसे हे देखील विचारात घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ (अ) विचारात घेतला असता त्याप्रमाणे दाव्यातील कोणतीही वादग्रस्त मालमत्तेचा अपव्यय केला जाण्याचा, तिचे नुकसान केले जाण्याचा किंवा ती अन्यक्रमीत केली जाण्याचा अथवा हुकुमनाम्याची अंमलबजावणी करताना तिची गैरपणे विक्री केली जाण्याचा धोका असल्याचे सिध्द करण्यात आल्यास न्यायालयाला दावा निकालात निघेपर्यंत किंवा पुढील आदेश दिला जाई पर्यंत तात्पुरता मनाई हुकुम देण्याचा अधिकार आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी केवळ दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करु नये इतक्या कारणास्तव मनाई मागितलेली असल्यामुळे उपरोक्त तरतूदीप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज हा चालण्यास पात्र आहे.

## –का र ण मि मां सा –

**११.** प्रस्तुतचा अर्ज हा तुर्तातूर्त मनाई हुकूमाकरीता आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज निकाली करताना खालील गोष्टींची पडताळणी करणे आवश्यक आहे.

**अ.** सकृतदर्शनी केस.

**ब.** अपरिमित नुकसान.

**क.** सोयीचा समतोल.

**ड.** पक्षकारांचे वर्तन (Conduct of the parties)

**मुद्दा क्रमांक १ करीता :–**

**१२.** मुद्दा क्रमांक १ हा सकृतदर्शनी केस यासंबंधी आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये सकृतदर्शनी केस याबाबत व्याख्या दिलेली नाही. परंतु, मा.सर्वोच्च न्यायालय व मा.मुंबई उच्च न्यायालय यांनी विविध न्यायनिवाडयांमध्ये सकृतदर्शनी केस निश्चित केलेली आहे. सकृतदर्शनी केस म्हणजे जर एखादया गोष्टीचे पुरावे दिले गेल्यास ती गोष्ट शाबीत होईल. थोडक्यात सकृतदर्शनी केस म्हणजे यशाची शाश्वती. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १३ ते १५ हे दावा मिळकत गट क्र.१९२ बाबत त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे त्यांना मनाई आदेशाद्वारे प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. याउलट प्रतिवादी क्र.१३ ते १५ यांच्या म्हणण्याचे अवलोकन करता त्यांनी गट क्र.१९२ ही दावा मिळकतच नसल्यामुळे त्याबाबत आदेश करणे उचित नसल्याचे म्हटलेले आहे. सबब, उपरोक्त गोष्टी विचारात घेवून प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णित करणे योग्य राहील.

**१३.** प्रतिवादी क्र.१३ ते १५ च्या कथनाप्रमाणे गट क्र.१९२ ही दावा मिळकत नाही. सबब, गट क्र.१९२ ही दावा मिळकत आहे किंवा कसे ही बाब सर्वप्रथम निर्धारित करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादपत्राचे अवलोकन करता वादी यांनी दि.११/१२/२०२१ रोजी नियमित दिवाणी दावा क्र.१५७/२०२१ मध्ये पारित करण्यात आलेला लोकअदालतमधील हुकुमनामा हा प्रस्तुत दाव्याद्वारे आव्हानित केलेला आहे. कायद्यातील स्थापित सिद्धांतानुसार वादपत्राचे एकत्रीतरित्या वाचन करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादपत्र विचारात घेतले असता वादी यांनी गट क्र.४५ हा त्यांच्या मालकीचा असल्याचे कथन केले आहे. परंतु विनंती कलमामध्ये वादीने हुकुमनामा रद्दबातल करुन मागितलेला आहे व त्या अनुषंगाने इतर अनुषांगिक विनंती मागितल्याचे दिसून येते.

नियमित दिवाणी दावा क्र.१५७/२०२१ मधील हुकुमनाम्याचे अवलोकन करता त्यामध्ये गट क्र.१९२ समाविष्ट असल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत गट क्र.१९२ दावा मिळकत नसल्याचे म्हणणे संयुक्तीक ठरणार नाही.

**१४.** अभिलेखाचे अवलोकन करता यापूर्वी नि.५ वर करण्यात आलेल्या आदेशाद्वारे नियमित दिवाणी दावा क्र.१५७/२०२१ मध्ये पारित करण्यात आलेल्या तडजोडीच्या हुकुमनाम्याच्या अंमलबजावणीस स्थगिती दिल्याचे दिसून येते. सदर तडजोड हुकुमनाम्यामध्ये गट क्र.१९२ देखील नमूद आहे. परंतु सदर स्थगिती आदेशामुळे त्याबाबतची तडजोड महसूल दप्तरी नोंद झालेली नाही. वादी व प्रस्तुत प्रतिवादी क्र. १३ ते १५ यांच्या कथनाप्रमाणे उपरोक्त तडजोड ही न्यायालयास फसवून केलेली आहे. परंतु सद्यस्थीतीत सदरचा हुकूमनामा कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्दबातल ठरविलेला नाही. सबब,सद्यस्थितीत प्रतिवादी क्र.४ यांचा हक्क व अधिकार त्यामध्ये समाविष्ट असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१३ ते १५ कथन करीत असलेली फसवणूक ही अद्याप शाबित झालेली नाही. त्यासाठी उभय पक्षकारांचा पुरावा विचारात घेणे आवश्यक आहे. परंतु दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र. १३ ते १५ यांनी गट क्र. १९२ मध्ये त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण केल्यास दाव्यामध्ये क्लिष्टता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब, प्रतिवादी क्र.४ यास प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येते.

**१५.** त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.४ ने नि.८९ सोबत सहाय्यक दुय्यम निबंधक वर्ग २ हवेली क्र.१२ यांनी दाखल केलेले पत्र विचारात घेता दस्त क्र.१४९९४/२०२५ हा गट क्रमांक १९२ बाबत असल्याचे दिसून येते. त्यामुळे गट क्र.१९२ बाबत त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण झाल्यास प्रतिवादी क्र.४ यांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तुर्तातुर्त मनाईचा मुळ उद्देश हा

दावा मिळकतीचे निकालापर्यंत संवर्धन करणे असा आहे. त्याचप्रमाणे आधी म्हटल्याप्रमाणे हुकुमनामा हा कायदेशीर आहे किंवा कसे ही बाब अद्याप न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे हुकुमनाम्यामध्ये नमूद असलेल्या मिळकती यांची सद्यस्थिती कायम ठेवणे आवश्यक आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये विचारात घेता भविष्यातील गुंतागुंत टाळण्याकरीता तुर्तातुर्त मनाई आदेश देणे योग्य होईल. त्यामुळे सोईचा समतोल देखील प्रतिवादी क्र.४ यांच्या बाजूने असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ४ करीता –**

**१६.** मुद्दा क्रमांक १ ते ३ चे विवेचनावरुन प्रतिवादी क्र.४ यास प्रथमदर्शनी केस असल्याचे दिसून येते, तसेच सोयीचा समतोल त्यांच्या लाभात असल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी क्र.४ चे अपरिमित नुकसान होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्रमांक ४ च्या निष्कर्षाकरीता मी, पुढील आदेश पारीत करतो.

**– आ दे श –**

**१.** प्रस्तुत अर्ज (निशाणी ८४) मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्र.१३ ते १५ अथवा त्यांच्यातर्फे हक्क सांगणाऱ्या इतर कोणत्याही इसमांना गट क्र.१९२ मौजे शिवरे, ता.भोर, जि. पुणे या मिळकतीबाबत कोणत्याही प्रकारचे त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध निर्माण करण्यापासून दाव्याच्या अंतिम निकालापर्यंत तुर्तातुर्त हुकुमाद्वारे मनाई करण्यात येते.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2025.09.20 17:42:42 +0530

**ठिकाणः– भोर .** **( एस.डी.शिरसाट )**
**दिनांकः– १९.०९.२०२५.** **२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**भोर.**

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | |
|---|---|
| Name of the Steno | Shri. A.D.More |
| Court Name | Hon'ble S.D. Shirsat<br>2nd Jt.C.J.J.D.& J.M.F.C.,Bhor, Pune |
| Date of Order/Judgment | 19/09/2025 |
| Date of Sign Order/Judgment | 20/09/2025 |
| Order uploaded on | 20/09/2025 |